
# नाशिक मेट्रो निओ प्रकल्पाला केंद्र सरकारची लवकरच मान्यता

नाशिक शहरासाठी योजिलेल्या एकमेवाद्वितीय, नाविन्यपूर्ण आणि प्रतिष्ठेच्या मेट्रो निओ प्रकल्पाला लवकरच केंद्र सरकारची मान्यता मिळणार आहे व प्रत्यक्षात मेट्रो निओ उभारणीचे काम सुरु होईल. दिनांक २४ मार्च २०२१ रोजी केंद्र शासनाच्या केंद्रीय अर्थ मंत्रालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या पब्लिक इनव्हेसमेंट बोर्ड (PIB) यांनी या प्रकल्पाला अनुमोदित केले आहे. त्यामुळे या प्रकल्पाचा अंतिम मान्यता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. लवकरच केंद्र शासनाची अंतिम मान्यता या प्रकल्पाला मिळून प्रकल्पाचे काम सुरु होईल.

केंद्र शासन, राज्य शासन, सिडको आणि नाशिक महानगरपालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून नाशिक शहरासाठी ३३ किमीचा मेट्रो निओ मार्ग बनवण्यात येणार आहे. गंगापूर ते मुंबई नाका आणि गंगापूर ते नाशिक रेल्वे स्थानक अशा ३३ किमीच्या दोन मार्गिकांमध्ये एकूण ३० स्थानके असणार आहेत. हा २०९२ कोटींचा प्रकल्प ४ वर्षांत पूर्ण होईल. नाशिक मेट्रो निओ प्रकल्प हा नाविन्यपूर्ण अश्या रबर टायर बस वापरून जलद प्रवासाची सुविधा देण्यात येणार आहे. या रबर टायर बस ओव्हरहेड इलेक्ट्रिक द्वारा चालवण्यात येतील. संपूर्ण ३३ किमीची मार्गिका उन्नत असेल, त्यामुळे शहरातून या बस विनासायास व जलद गतीने प्रवास करू शकतील. नाशिक शहराच्या प्रवासी संख्या लक्ष्यात घेऊन या प्रकारचा नाविन्यपूर्ण मेट्रो निओ प्रकल्प योजण्यात आला आहे. मेट्रो निओ हा इतर शहरात असणाऱ्या मेट्रो इतकाच आरामदायी, सुरक्षित, पर्यावरण पूरक आणि जलद असणार आहे. मेट्रो निओचे कोच हे इतर मेट्रोच्या कोचसारखेच वातानकुलीत असणार आहेत. भारतात अशाप्रकारचा प्रकल्प प्रथमच साकार होत असून त्यामुळे नाशिक शहराचे नाव जगभरात प्रसिद्ध होणार आहे.

श्री. दुर्गाशंकर मिश्रा (सचिव, आवास आणि शहरी कार्य मंत्रालय, भारत सरकार), डॉ. ब्रिजेश दीक्षित (महासंचालक, महामेट्रो), यांनी या प्रसंगी म्हंटले आहे कि, 'केंद्र शासनाची अंतिम मान्यता लवकरच प्राप्त होणार असून त्यांनी महामेट्रोच्या अधिकारी वर्गाला कामाची रुपरेषा तयार करून काम सुरु करण्याचे नियोजन करण्याच्या सूचना त्या त्या विभागांना देण्यात आल्या आहेत.' व श्री. कैलास जाधव (आयुक्त, नाशिक महानगरपालिका) यांनी या प्रसंगी म्हंटले आहे की, ' हा प्रकल्प नाशिक शहराचे भविष्य बदलविणारा असून नाशिक महापालिका नाशिक मेट्रो निओ बांधकामास सर्वोतोपरी सहकार्य देईल.'


PRIORITY MRTS CORRIDORS
CORRIDOR 1 (22 Km, 19 Station)
CORRIDOR 2 (10 Km ,10 Station)
STATION LOCATIONS
INTERCHANGE STATION (GANGAPUR & CBS)
DEPOT LOCATIONS
FEEDER ROUTES
DEPOT – 1 (4.80 Acre)
GANGAPUR
JALAPUR
GANPAT NAGAR
KALE NAGAR
JEHAN CIRCLE
THATTE NAGAR
SHIVAJI NAGAR
PANCHAVATI
PANCHAVATI
DHRUV NAGAR
SHRAMIK NAGAR
MAHINDRA
SHANESHWAR NAGAR
SATPUR COLONY
MIDC
ABB CIRCLE
PARIJAT NAGAR
MICO CIRCLE
CBS
MUMBAI NAKA
SHARDA CIRCLE
DWARKA CIRCLE
NANDUR NAKA
GAYATRI NAGAR
SAMTA NAGAR
GANDHI NAGAR
NEHRU NAGAR
DATTA MANDIR
DEPOT – 3 (4.24 Acre)
DEPOT – 2 (5.68 Acre)
NASHIK ROAD RLY STN
GARWARE


Overhead Traction while operating on the elevated corridor.
FEEDER BUS


METRO NEO


Best in Class Mobility


NANDUR NAKA
MUMBAI NAKA